


# बसव पथ

(मराठी द्वैमासिक)

।। बसव पथ - विश्वपथ ।।

* वर्ष ६ * अंक ५ * मार्च - एप्रिल २०१६ * पृष्ठे ५२ * मूल्य ₹ १५/-




ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

॥ श्री गुरु बसवलिंगाय नमः ॥



करुणेचा महासागरु। समतेचा महामेरु॥
दीनदलितांचा आधारु। माऊली बसव॥

# बसव पथ

(म.बसवेश्वर आणि अन्य शरणांच्या जीवन व संदेश प्रसारार्थ समर्पित)
• वर्ष ६ • अंक ५ • मार्च-एप्रिल २०१६
• पृष्ठे ५२ • मराठी द्वैमासिक • मूल्य रु. १५/-
• Vol. - 6 • Issue - 5 • March - April 2016
RNI No. MAHMAR/2010/41737
ISSN 2348 - 4276
e-mail : basavapatha@gmail.com

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *



संस्थापक अध्यक्ष :
लिं.डॉ.बी.डी.जत्ती

**बसव समिती पदाधिकारी**

अध्यक्ष :
**श्री. अरविंद ब. जत्ती**
ज्येष्ठ उपाध्यक्ष :
**श्री. प्रभुदेव जे. चिगटेरी**
उपाध्यक्ष :
**डॉ. लीलादेवी आर. प्रसाद**
**श्री. हनुमंतरेड्डी मुद्नाळ**
प्रधान कार्यवाह :
**श्री. सी. आर. चिक्कमठ**
**श्री. एच. एस. देवाडिग**
खजानिस :
**श्री. डी. एम. श्रीधर**
सहकार्यवाह :
**श्री. ए. शिवमहादेवन्**
**श्री. एस. एस. नागराळ**

**बसव समिती**
बसव भवन,
श्री बसवेश्वर सर्कल,
बेंगळूरु-560001
फोन:(080)22355953,22265505
e-mail:basavasamithi.india@gmail.com

## अंतरंग

* म. बसवेश्वर अध्यासन : स्तुत्य उपक्रम ६
संपादकीय

* शरणांची वचने-संतांचे अभंग :
अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा महाघोष ७
श्री. राजू ब. जुबरे

* महिला सबलीकरणाचे अग्रदूत : म.बसवण्णा १७
डॉ. नलिनी वाघमारे

* महात्मा बसवेश्वरांचा वैज्ञानिक दृष्टिकोन २६
डॉ. विजय पां. कुलकर्णी

* महात्मा बसवेश्वर आणि कार्ल मार्क्स ३१
प्रा. डॉ. दत्ताहरी होनराव

* बसव मुक्तांगणातील 'स्व'तंत्र शरणी ३५
प्रा. राजशेखर एम. करडीगुद्दी

* म. बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान :
सामाजिक उपयुक्तता ४४
डॉ. रत्नाकर बा. लक्षटे

'बसव पथ' हे पत्र मुद्रक सोमनाथ मल्लिकार्जुन लुल्ले यांनी प्रकाशक अरविंद बसप्पा जत्ती,प्रेसिडेंट, बसव समिती ट्रस्ट व मालक बसव समिती ट्रस्ट यांच्यासाठी लुल्ले प्रिंटर्स, अप्पा चेंबर्स, लोखंड गल्ली, मु. पो. लातूर, ता. जि. लातूर-४१३५१२(महाराष्ट्र) येथे मुद्रित करून तेथेच प्रसिद्ध केले. संपादक - बाळासाहेब मलगौडा पाटील.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

# म. बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान: सामाजिक उपयुक्तता





- डॉ. रत्नाकर बा. लक्षटे, राज्यशास्त्र विभागप्रमुख, देगलूर महाविद्यालय, देगलूर, जि. नांदेड. मो. ९०२८९७६१५१

मनुष्य जीवनाच्या कल्याणामध्ये बाधा ठरणाऱ्या अज्ञान, भोगवाद, चंगळवाद, वांशिक संघर्ष, दहशतवाद, कौटुंबिक हिंसाचार, ताण-तणाव इ. चा नाश करण्याचे सामर्थ्य बसवेश्वरांच्या तत्त्वज्ञानात असल्याने त्याची सामाजिक उपयुक्तता आजही सिद्ध होते.

सुखी व समृद्ध जीवन ही प्रत्येक मानवाची इच्छा असते. मानवाच्या या इच्छापूर्तीसाठी आंतरिक व बाह्य शक्तीचे संयोजन महत्त्वाचे आहे. मनुष्य बाह्यतः सुखी झाला, परंतु त्याच्या आंतरिक सुखाचे काय ? या मानवाला पडलेल्या प्रश्नाचे उत्तर महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्यातून मिळते. कारण वचन साहित्याचा दृष्टिकोन हा व्यापक, विशाल, विश्वात्मक असा सर्वांना सामावून घेणारा, कालत्रयी स्पर्श करणारा आहे. त्यामुळे प्रस्तुत लेखात महात्मा बसवेश्वरांच्या तत्त्वज्ञानाची सामाजिक उपयुक्तता पाहणार आहोत. महात्मा बसवेश्वरांनी वचन साहित्य, इष्टलिंग व अनुभव मंटपातून समाजाला उपयुक्त ठरणारे व अंगीकारण्यास सुलभ असणारे चिंतन समाजासमोर ठेवले. वचन साहित्य व शरण कार्याच्या सामाजिक उपयुक्ततेसंदर्भातील विचार महाराष्ट्रासह संबंध भारतातील नंतरच्या वाङ्मयीन संशोधन, प्रबोधन व परिवर्तनाच्या विचार व कार्यास मार्गदर्शक ठरतात. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत

महात्मा गांधीजी इ. अनेक विचारवंत व समाज सुधारकांनी बसवेश्वरांचाच आपापल्या परीने मांडला. विषयाची मर्यादा लक्षात घेता, त्यावर अधिकचा करणे इष्ट ठरत नाही. महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्याची सामाजिक पाहण्यासाठी शरणांच्या व इतर महानुभावांनी केलेल्या लिखाणाचा आधार लागेल. समन्वयता, दूरदृष्टी, एकात्म भावना, सकल जीवात्म्यांच्या कल्याणाची प्रबोधन, सुधारणा, आत्मशुद्धीची आवश्यकता, लोकमांगल्याची भावना, मानवता, व नैतिकतेचा आग्रह इ. सह वचन साहित्याची अनेक वैशिष्ट्ये सांगता येतील.

बहुधा १२व्या शतकाच्या प्रारंभापासून वचन साहित्यास सुरुवात झाली. ईश्वर, धर्म, देवालये इ. मध्ये कर्मकांडाचे प्राबल्य वाढले होते. कर्मकांडाच्या अवास्तव मुळे समाजाचे राजकीय, सामाजिक, धार्मिक जीवन अस्थिर व गुंतागुंतीचे बनले दगडाच्या देवाची पूजा करणे, अन्नत्याग करणे, उच्च-नीचता, श्रेष्ठ-कनिष्ठता, स्पृश्य-अस्पृश्यता, निरक्षरता, अंधश्रद्धा, स्त्री निंद्यता, हिंसेला प्राधान्य देणाऱ्या चे आग्रहपूर्वक समर्थन इत्यादी समाजाच्या विकृतींचे दर्शन वचन साहित्यातून १२व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी घडविले. या सर्वांवर बसवेश्वरांनी 'अंतर्ज्ञानच गुरू' हा उपाय सांगितला.

नको करू चोरी, नको करू हत्या,
नको बोलू असत्य, नको रागावू,
नको करू आत्मस्तुती, नको करू निंदानालस्ती,
नको मानू कोणा तुच्छ, हीच अंतरंगशुद्धी,
हीच बहिरंगशुद्धी, अन् हीच कुडलसंगमदेवास
प्रसन्न करण्याची रीती.

उपरोक्त वचनातून बसवेश्वरांनी ईश्वराला प्रसन्न करून घेण्यासाठी आटापिटा करणाऱ्या मानवाला व सुखासाठी धावपळ करणाऱ्या समाजाला होमहवन, व्रतवैकल्ये, उपासतापास, तीर्थयात्रा, यासारख्या कर्मकांडाला महत्त्व दिलेले नाही. आपल्या मानवी देहाची व जीवनाची सामाजिक उपयुक्तता प्रस्तुत करण्यासाठी वरील सप्तआचार संहितेचे पालन करावे. अंतरंग शुद्धी व बहिरंग शुद्धीच्या एकरूपतेने समाजाला सहिष्णू, नीतिमान व समंजस बनवता येईल हा संदेश दिला.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

UDAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

बसवेश्वरांनी वचन साहित्यातून कर्मकांडाला प्रखर विरोध केला. कर्मकांड, त्याची प्रतिके बाजूला ठेवून, समाज–उन्नतीच्या मुळाशी असलेल्या नियमांना समोर ठेवून, सात्त्विक, सदाचारी आचरणाचा मार्ग ईश्वरी उपासनेसाठी सांगितला.

**देवलोक आणि मृत्युलोक भिन्न नव्हे.**
**सत्य बोलणेच देवलोक, असत्य बोलणेच मृत्युलोक.**
**सदाचार हाच स्वर्ग, अनाचार हाच नरक.**
**याला तूच साक्ष, हे कूडलसंगमदेवा.**

मानवी जीवनाच्या आंतरिक व बाह्य सुखाचा मार्ग देवलोकाच्या प्राप्तीतूनच होतो, त्यासाठी दगडाच्या देवासमोर आराधना करूनच व पाप–पुण्याचे मोजमाप होऊन पुरोहितामार्फतच्या संदेशवहनाने मोक्ष मिळतो अशी धारणा समाजात रुजविण्यात आलेली आहे. पण मानवी जीवनातील मोक्षप्राप्तीचा हा मार्ग आभासात्मक व मायावी स्वरूपाचा आहे. त्यास शोषण, फसवणूक व गुलामीचा स्पर्श आहे. खरा आनंद, सामाजिक सहजीवनाची अनुभूती मृत्यूनंतरं स्वर्गलोकात न मिळता, सदाचाराने व सत्याने वागण्यातून पृथ्वीवरच मिळते. बसवेश्वरांचा हा समाज बांधणीच्या प्रक्रियेत आदर्श नागरिक घडवण्याचा उत्कृष्ट प्रयत्न आहे. त्याची २१व्या शतकातील उदासीन व निराशावादी, आत्महत्याग्रस्त आणि मानसिकदृष्ट्या खचलेल्या मानवाला गरज आहे.

महात्मा बसवेश्वरांनी सुखप्राप्तीच्या मार्गाने मार्गक्रमण करणाऱ्या तत्कालीन समाज व धर्मव्यवस्थेत अनेक मौलिक सुधारणा केल्या. बहुदेवतोपासना हा व्यक्तीच्या सुखप्राप्तीतील मोठा अडथळा आहे. बसवेश्वरांनी अनेक वचनांतून मानवी मन, कल्पनेतील व लौकिक व्यवहारातील अनेक देवदेवतांची उदाहरणे देऊन बहुदेवापासनेतील फोलपणा स्पष्टपणे निदर्शनास आणला. बसवेश्वर हे सेश्वरवादी होते. मनुष्य आस्तिक असावा, परंतु त्याची अस्तिकता अज्ञानी, अविवेकी व तर्कहीन नसावी. खऱ्या आस्तिकतेने जीवनाचा मार्ग भ्रष्ट न करता मार्गदर्शन करावे. असाच मार्ग सांगताना बसवेश्वर म्हणतात, देव हा भक्ताच्या हृदयात असतो. 'देह हेच देवालय' हे भक्ताने जाणावे. जीवातील 'शिव' स्मरण्यासाठी ज्याच्या जाणण्याने त्याची भ्रमंती थांबते, आर्थिक, शारीरिक, मानसिक शोषण होणार नाही, सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा खालावणार नाही, उलट स्वतःवरील विश्वास वाढेल, स्वतःकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी

...प्रेरित होऊन इतरांकडे देवत्वाच्या भावनेने पाहण्याची दृष्टी विकसित व्हावी.

उन्नती, उत्कर्ष व उद्धारासाठी आजच्या काळातील मनुष्य धडपडतो आहे. प्रत्येक जण अनेक साधने व मार्गांचा वापर करून आपला उद्धार करण्याचा प्रयत्न करतो. बसवेश्वर म्हणतात, मानवाचे श्रेष्ठत्व, त्याच्या जीवनाची फलश्रुती ही जात व कुळानुसार ठरत नसते. जात, गोत्र, वंश, कुळ कनिष्ठ असूनही श्रम, प्रामाणिकपणा व विद्येच्या साहाय्याने जगी श्रेष्ठत्व मिळविलेले अनेक ऋषी आहेत. आजही डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बाबा आमटे, अमर्त्य सेन इ. नी विद्येच्या प्राप्तीने सामाजिक श्रेष्ठत्व सिद्ध केले. अज्ञानाने आत्मघात होतो. विद्येला प्रसन्न करण्याची रीत जाणल्यास अविचाराकडे जाणाऱ्या मनाची धाव आपोआपच रोखता येते. विद्या, कायक, सदाचार हे कैलासाकडे जाणारे मार्ग नाहीत, तर पृथ्वीलाच स्वर्ग बनविणारे आहेत. तो स्वर्ग पाहण्याची संधी याच जन्मात मिळवून देणारे आहेत. आदर्श समाज बांधणीत प्रत्येक व्यक्तीने केलेले सत्कर्म अधिक श्रेयस्कर असते. समाजाला आवश्यक असणारा धर्म बसवण्णांनी दयेत मानला. 'अंतर्ज्ञानच गुरू' हा आत्मज्ञानाचा मार्ग आहे. कायकचि कैलास हे मोक्षाच्या सुखाचे साधन आहे. समाजाच्या उभारणीसाठी आवश्यक असणारी निःस्वार्थ वृत्ती, सदाचरण, विवेकी ईश्वरनिष्ठा, श्रद्धा, मानवता, समता, बंधुता इ. मूल्यांची शिकवण दिली. प्रत्येकास स्वतःचे लौकिक व पारमार्थिक जीवन उंचावण्याचा मार्ग बसवण्णांनी दाखविला.

बसवेश्वरकाळातील समाजव्यवस्थेचे व्यवच्छेदक चित्रण वचन साहित्यातून प्रकट झाले. मानवनिर्मित जात, वर्ण, अस्पृश्यता, कुप्रथा या सर्वांचा समाचार बसवेश्वरांनी घेतला, तो असा – ''भुयिणीचा सुत, नाव त्याचे व्यास। मार्कंडेय खास मातंगिणीचा मंडुकाची कन्या, थोर मंदोदरी, जातीची ती थोरी काय कीजे ? बेरडाचे पोटी अगस्तीचा जन्म, चांभार उत्तम तो दुर्वास। कश्यप लोहार, कौंडिण्य तो न्हावी, तिन्ही लोकी बरवी. प्रसिद्ध जी । कूडलसंगमदेवा, ऐसे ते वचन, शिवभक्त कुलीन कश्यपही।।''

तत्कालीन मानव व ग्रंथनिर्मित जाती व तिच्या फोल सिद्धांतांना नाकारून जात हा मानवाच्या श्रेष्ठत्वाचा अथवा गौणत्वाचा निकष नसतो; तर त्याचे श्रेष्ठत्व, मोठेपणा, ख्याती त्याच्या ज्ञानसाधनेत व तिच्या सामाजिक उपयुक्ततेत असते. अशाच व्यक्तींच्यातून एकसंघ, विकासशील, समतावादी समाज घडतो. कोण ज्येष्ठ, कोण कनिष्ठ हा भेदाभेद न जाणता कायकात गुंतणारा व शिवभक्तीत सदैव मग्न असणाराच

ADAT MAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

श्रेष्ठ असतो. डॉ. चंद्रकांत देऊळगावकर म्हणतात – ''बसवेश्वर हे पहिले संत, की ज्यांनी बहुजन समाजासाठी वचनांची रचना केली.'' बसवेश्वरांच्या उच्च शिकवणुकीमुळे व कृतीमुळे जातिभेदाच्या संकल्पनेत व समाजव्यवस्थेत परिवर्तन झाल्याचे सांगताना डॉ. अशोक कामत म्हणतात– 'महात्मा बसवेश्वरांचा अभ्यास हा आनंददायी आणि प्रेरणादायी आहे. आपल्या दक्षिण भारतीय धर्मसाधनेच्या इतिहासामध्ये महात्मा बसवेश्वर हे केवळ धर्मसंस्थापक संत सत्पुरुष नव्हेत, तर मानवमात्राच्या उन्नयनासाठी, विश्वकल्याणाच्या दिशेने अवघ्यांना मिळून अग्रेसर होता यावे, यासाठी प्रेरक ठरणारे शक्तिस्रोत आहेत. मराठी संत साहित्य, संस्कृती ही कर्नाटकातील आपले बांधव आणि महात्मा बसवेश्वर यांची ऋणी आहे. बसवेश्वरांनी अठरा पगड जातिसमाजातील मंडळींना एक नवी जाग आणली. कर्मकांडाची व्यर्थता समजावून सांगून बहुजनांना त्यांनी परमार्थ प्रवण केले. त्यांनी जगाची मांदियाळी मेळवून दांभिक पुरोहित वर्ग व त्यांच्या अधीन असणारा प्रशासकवर्ग यांच्याविरुद्ध संघटन केले. त्यांची क्रांती मूलगामी स्वरूपाची होती. त्यांचा संघर्ष कठोर निश्चयाचा होता. हे सारे पुढे हळूहळू सौम्य स्वरूपात वारकरी पंथात येत राहिलेले दिसते.'' अशोक कामतांसह अनेकांनी जातिभेद, कर्मकांड, अस्पृश्यता, स्त्री सुधारणा, स्त्री हक्क, बहुजन हित यासंदर्भात बसवेश्वरांच्या कार्याचे योगदान वर्णिलेले आहे. माजी राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग ''महात्मा बसवेश्वरांचा मानवतावादच राष्ट्राला तारू शकेल'' म्हणतात, तर डॉ. निर्मलकुमार फडकुले, ''बसवेश्वरांचे जीवन हा खरं तर महाकाव्याचा विषय आहे'' असे म्हणतात. या सर्व व्यक्तींच्या विधानांवरून असे म्हणावेसे वाटते की, बसवेश्वरांच्या मूलगामी वचन साहित्य व समाजकार्याचा आधुनिक भारतावर उपयुक्त आणि प्रगतिकारक परिणाम झाला. जामिभेदाची बंधने, सामाजिक विषमता आणि भेदाभेद शिथिल करण्याइतपत कायदा सक्षम बनवणारे समाजमन लोकशाहीच्या स्थापनेतून पुढे आले. इंग्लंडमधील थेम्स नदीच्या किनारी बसवेश्वरांचा अर्धाकृती पुतळा बसवण्यास इंग्लंडच्या पार्लमेंटने मंजुरी देऊन बसवेश्वरांच्या विचारांची २१व्या शतकातील उपयुक्तता सिद्ध केली आहे.

मानवी जीवनाचे अंतिम सत्य काय ? या प्रश्नाचे दिलेले १२व्या शतकातील उत्तर आजही जगण्याची कला ठरवण्यास व मानवी जन्माचा हेतू सांगण्यास उपयुक्त ठरते. मनुष्यजीवनाच्या कल्याणामध्ये बाधा ठरणाऱ्या अज्ञान, भोगवाद, चंगळवाद, वाढता वांशिक संघर्ष, दहशतवाद, वंचित व आदिवासींच्या मानवी हक्कांचे उल्लंघन,

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

... हिंसाचार, हिंसक स्पर्धा, मानसिक ताणतणाव इ. चा नाश करण्याचे सामर्थ्य ...राच्या वचन साहित्यात व जीवन जगण्याच्या पद्धतीत आहे. परंतु आजच्या ... अतिरेकी बुद्धिप्रामाण्य, जडवादी प्रवृत्ती, अहंकार, संपत्ती व सत्तेच्या ...णात त्याचे चिंतन करण्याची गरज वाटत नाही. केलेच तर ते उपदेशात्मक, ...मक स्वरूपाचे असते. त्यावर अनुभाव प्रामाण्य, निर्मल समाधान, एकेश्वरवाद, ... करण्याची हातोटी, सदाचार, दासोह, परधन व परस्त्रीचा मोह त्यागणे या व ... अनेक बसवेश्वरी तत्त्वांनी आपण मानवी जीवन उदात्त व उत्तम बनवू शकतो. ...वादी शरणांनी समाजजागृतीसाठी अनुभव मंटप व इष्टलिंगाच्या माध्यमातून ...गड जातींना एकत्र आणून, समतेचा कृतिशील आराखडा आखून सामाजिक ...चा पाया आध्यात्मिक समतेद्वारे रचला, ज्यातून हजारो वचनांची निर्मिती, ...कनिष्ठा, स्त्री-पुरुष समता, दासोह, ग्रंथ प्रामाण्यतेऐवजी अनुभाव प्रामाण्यता, ...श्रद्धा निर्मूलन, जात व अस्पृश्यता निर्मूलन, इष्टलिंगाच्या माध्यमातून शिवयोगाची ...त्या, शरण संस्कृती इ. प्रत्यक्ष कृतीत उतरून हजारो शरणांच्या मुखातून बाहेर ...डणारा ''शरणुशरणार्थी''च्या गर्जनेने प्रबोधनाची लाट निर्माण झाली.

दैनंदिन कायक पार पाडल्यानंतर अनुभव मंटपाच्या माध्यमातून सर्व समाज ...धवांचे एकत्रीकरण, पारंपरिक ज्ञानाची चिकित्सा, संवर्धन व संशोधन करून ते ...ढच्या पिढीपर्यंत पोहचवण्यासाठीची जंगम यंत्रणा, अस्पृश्याच्या पोटी जन्म झाल्याचे ...गून व त्यांच्या घरी भोजन करून, बेटी व्यवहाराच्या संस्कृतीस खतपाणी घातले इ. उदात्त प्रज्ञेचा अनुभव कर्नाटक, महाराष्ट्राच्याही बाहेरील विदेशातील बांधवही मोठ्या प्रेमाने घेतात. व्यक्तीला सुसंस्कृत करण्यासाठी वचनांच्या माध्यमातून दिलेले धडे, त्यांस राबवण्यासाठी अनुभव मंटपाचे संस्कार केंद्रात केलेले रूपांतरण व आज गावोगावी अनुभव मंटपाच्या माध्यमातून शरण संस्कृती, वर्तमान समाज राज्यव्यवस्था याविषयी होणारी जागृती व उत्तम नागरिक घडवण्याच्या दिशेने होणारी वाटचाल पाहता बसवेश्वरांच्या तत्त्वज्ञानाची सामाजिक उपयुक्तता आजही सिद्ध होते.

संदर्भ –


१. डॉ. अशोक मेनकुदळे : क्रांतिकारी युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर.

२. संतसाहित्य आणि बसवेश्वर वचन चिंतन : डॉ. सूर्यकांत घुगरे.

३. युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर : प्रा. भीमराव पाटील व प्रा. विजयकुमार करजकर.


Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded